http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email: beedvatsav@gmail.com ●किंमत ३ रुपये

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वाटचाली २० वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा

http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

## प्रस्थान सोहळ्याला सुरुवात

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा आजपासून देहूमध्ये सुरु होत आहे. यासाठी राज्यभरातून वारकरी देहू नगरीत दाखल झाले आहेत. पहाटेपासूनच वारकऱ्यांनी मंदिरामध्ये गर्दी केली आहे. दुपारी २ वाजता प्रस्थान सोहळ्याला सुरुवात होणार आहे. सायंकाळी ५ च्या सुमारास तुकोबांच्या पालखीचे प्रस्थान होईल.



# टाळ मृदुंगाच्या गजराने देहूनगरी दुमदुमली!!

## तुकाराम महाराजांच्या पालखीचे प्रस्थान, कुठे-कधी असणार मुक्काम? संपूर्ण माहिती



### श्री. क्षेत्र देहू ते पंढरपूर

| वार | तारीख | स्थळ |
|---|---|---|
| बुधवार | 18/06/2025 | श्री क्षेत्र देहू |
| गुरुवार | 19/06/2025 | आकुर्डी |
| शुक्रवार | 20/06/2025 | नानापेठ पुणे |
| शनिवार | 21/06/2025 | निवडुंगा विठ्ठल मंदिर |
| रविवार | 22/06/2025 | लोणी काळभोर |
| सोमवार | 23/06/2025 | यवत |
| मंगळवार | 24/06/2025 | वरवंड |
| बुधवार | 25/06/2025 | उडंवडी गवळ्याची |
| गुरुवार | 26/06/2025 | बारामती |
| शुक्रवार | 27/06/2025 | सणसर |
| शनिवार | 28/06/2025 | निमगाव केतकी |
| रविवार | 29/06/2025 | इंदापुर |
| सोमवार | 30/06/2025 | सराटी |
| मंगळवार | 01/07/2025 | अकुलज |
| बुधवार | 02/07/2025 | बोरगाव |
| गुरुवार | 03/07/2025 | पिराची कुरोली |
| शुक्रवार | 04/07/2025 | वाखरी |
| शनिवार | 05/07/2025 | पंढरपूर मुक्काम |
| रविवार | 06/07/2025 | पंढरपूर |

### देहूमध्ये उत्साहाचे वातावरण

या सोहळ्यात भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी एसडीआरएफ टीम तैनात करण्यात आली आहे. यंदाचा ३४० वा पालखी सोहळा आहे. देहू नगरी टाळ–मृदंगाच्या निनादाने दुमदुमून गेली आहे. संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याला सुरुवात झाल्याने देहूमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

### पालखीचा मार्ग कसा असेल?

● संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा मार्ग कसा असेल? संत तुकाराम महाराजांची पालखी आज १८ जून रोजी देहूतून प्रस्थान करणार आहे. ही पालखी विविध गावांमधून मार्गक्रमण करत ५ जुलै रोजी पंढरपूरला पोहोचेल. पालखी मार्गामध्ये आकुर्डी, पुणे, लोणी काळभोर, यवत, बारामती, इंदापूर, अकलूज आणि वाखरी यांसारख्या प्रमुख गावांचा समावेश आहे. देहूतून निघाल्यानंतर १९ जूनला पालखी आकुर्डीला जाईल. २० जूनला ती पुण्यात नाना पेठ येथे पोहोचेल. २१ जूनला निवडुंगा विठ्ठल मंदिरात मुक्काम असेल. त्यानंतर २२ जूनला लोणी काळभोर आणि २३ जूनला यवत येथे पालखी विसावा घेईल.

### पालखी सोहळ्यात तीन उभे आणि तीन गोल रिंगण होणार

● पालखी सोहळ्यात तीन उभे आणि तीन गोल रिंगण होणार आहेत. बेलवडी येथे पहिले गोल रिंगण होईल. काटेवाडी येथे मेंढ्यांचे रिंगण होईल. इंदापूर येथे दुसरे गोल रिंगण होईल.

● सराटी येथे पादुकांना नीरास्नान घातले जाईल. अकलूज येथे तिसरे गोल रिंगण होईल. माळीनगर येथे पहिले उभे रिंगण, तोंडले बोंडले येथे धावा, बाजीराव विहीर येथे दुसरे उभे रिंगण, वाखरी येथे पादुका आरती आणि तिसरे उभे रिंगण होईल. यंदा तिथीचा क्षय झाल्यामुळे आंथुर्णे येथील पालखीचा मुक्काम रद्द करण्यात आला आहे. यंदा पालखी रथाच्या पुढे २७ दिंड्या आणि मागे ३७० दिंड्या सहभागी होणार आहेत.

### वारकरी पालखी सोहळ्यात सहभागी

● पालखीचा पुढील प्रवास २४ जूनला वरवंड, २५ जूनला उंडवडी गवळ्याची, २६ जूनला बारामती, २७ जूनला सणसर, २८ जूनला निमगाव केतकी, २९ जूनला इंदापूर, ३० जूनला सराटी, १ जुलैला अकलूज, २ जुलैला बोरगाव श्रीपूर, ३ जुलैला पिराची करौली आणि ४ जुलैला वाखरी मार्गे होईल.

● ५ जुलैला पालखी पंढरपूरला पोहोचेल. वारकरी मोठ्या उत्साहाने या पालखी सोहळ्यात सहभागी होतात.

### एस डी आर एफ टीम तैनात

● इंद्रायणी नदीच्या घाटावर भाविक स्नान करण्यासाठी येतात. त्यावेळी कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास, तात्काळ मदत मिळावी यासाठी एस डी आर एफ टीम तैनात करण्यात आली आहे. ही टीम इंद्रायणी घाटावर लक्ष ठेवणार आहे.

### अनेक मान्यवरांची उपस्थिती

● पालखी प्रस्थान सोहळ्याला अनेक मान्यवर येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती पालखी सोहळा प्रमुख दिलीप महाराज मोरे यांनी दिली.

## फटाके फोडणाऱ्या बुलेटवर पोलिस कारवाईची गरज

गेवराई, दि. (प्रतिनिधी) वर्दळीच्या रस्त्यावरून फट् फट् करत जाणारी बुलेट सर्वांच्याच नजरेत येते, बुलेटचे असंख्य चाहते आहेत, त्यामूळेच बुलेट लाखांच्या घरात पोहोचली असली तरीही त्याचा चाहता वर्ग असंख्य आहे. बुलेट घ्यायची आणि उगीचच रूबाबात सुस्साट पळवायची, हे आजच्या तरूणांची क्रेझ आहे. पण हीच क्रेझ तुम्हाला दुसऱ्याची डोकेदुखी झाली असल्याचे चित्र सध्या गेवराई शहरात पाहायला मिळत आहे.

आवडत्या बुलेटच्या बदललेल्या सायलेन्सरमधून फटाक्यांचा आवाज काढून तुम्हालाही मजा येत असेल. परंतु या फटाक्याच्या आवाजामुळे अनेक जणांना त्रास होत असून अचानक वाजणारे बुलेटच्या सायलेन्सर मधील फटाक्यामुळे बहुजणांना डचकल्यासारखे व छातीत धडधड झाल्यासारखे होते. मजा एकाची पण त्रास अनेक जणांना.. असा प्रकार सध्या गेवराई शहरात आहे. महिला व मुली दिसल्या की, बुलेटच्या सायलेन्सर मधून फटाके फोडायचे असेही बहाद्दर गेवराई मध्ये सध्या आहेत, या गैर प्रकाराकडे पोलीसांचे लक्ष नाही. गेवराईच्या नागरिकांमधून गेवराई पोलिसांनी याबाबत कारवाई करून संबंधित सायलेन्सर जप्त करावेत व त्या वाहनधारकाला दंड करावा परीणामी महिला व नागरिकांना होणारा त्रास बंद होईल.

बुलेट मोटार सायकलवरील अनधिकृत सायलेन्सर सुधारणेसह विविध नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी सदरील वाहने जप्त करता येतात. मोटार वाहन कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल व कारवाई करता येते हे सामान्य नागरिकांच्या लक्षात येत असून गेवराई पोलिसांच्या लक्षात कधी येणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

## मुंबई येथील 23 वी इंटरनॅशनल स्पोर्ट्स जीत कुणे- डो कराटे स्पर्धेत बीडच्या विद्यार्थ्यांना 10 पदके

मुंबई : ग्लोबल वर्ल्ड स्पोर्ट्स जीत कुणे–डो फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित 23 वी इंटरनॅशनल स्पोर्ट्स जीत कुणे– डो कराटे स्पर्धा–2025. स्पर्धेचे आयोजक राजेंद्र गिहरा (चीफ टेक्निकल डायरेक्टर ऑफ जीत कुणे डो फेडरेशन ऑफ इंडिया) समाजात वावरताना आत्मरक्षण काळाची गरज बनत आहेत स्पर्धेची चिकाटी आणि प्रयत्न करण्याची उर्मी बालवयात आणि बालपणात शिकायला मिळाली तर यश कसे संपादन करता येऊ शकते याची साक्ष बीड च्या कराटे खेळाडूंनी मुंबई येथील झालेल्या कराटे स्पर्धेत 10 पदके




जिंकून साक्ष दिली.

23 वी इंटरनॅशनल स्पोर्ट्स जीत कुणे– डो कराटे स्पर्धा मुंबई येथील अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स अंधेरी वेस्ट या ठिकाणी दिनांक 15 जून 2025 या दिवशी पार पडल्या. त्यामध्ये संपूर्ण देशासह इतर पाच ते सहा देशाने सहभाग ● पान २ वर...



## परळी शहरातील उदगीरकर व डुबे कुटुंबीयांचे धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन

परळी वैद्यनाथ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी वैद्यनाथ शहरातील उदगीरकर व डुबे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. शहरातील प्रसिद्ध व जुने व्यापारी शंकर अप्पा उदगीरकर यांचे नुकतेच निधन झाले होते, त्याचप्रमाणे प्रसिद्ध व्यापारी भगवानराव डुबे यांचेही अल्पशा आजाराने निधन झाले होते. या दोन्ही कुटुंबीयांची धनंजय मुंडे यांनी आज भेट घेऊन त्यांच्या कुटुंबियांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा देत मृतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करुन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, जयपाल लाहोटी, चेतन सौंदळे, कुमार व्यवहारे, शंकर कापसे यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## तलाठी शेतकऱ्यांच्या बाधांवर जाऊन पंचनामे करत नाहीत!!

आष्टी : प्रतिनिधी

आष्टी तालुक्यामध्ये चार ते पाच दिवसापुर्वी चक्री वादळ झाले होते यामध्ये शेतकऱ्यांचे अतिशय मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

शेतकऱ्याचे राहत्या घराच्या शेडचे पत्रे उडून गेले, दगडी बांधकाम पडले, शेतात असलेले फळांचे झाडे उलथून पडले, काही जनावरे दगावली शेळ्या मृत्यु पावल्या तरी ही तलाठी शेतकर्याच्या बांधावर नसुन खुर्ची धरून घट्ट बसले आहे.

या तलाठी व मंडळ अधिकारी यांना शेतकऱ्याची कसलीही चिंता वाटत नाही यामुळेच शेतकरी आत्महत्या करत आहेत. महसुल विभागामध्ये शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात हेंडसाळ होत आहे.

जिल्हाधिकारी यांनी सर्व महसुल विभागाला आदेश व सुचना दिल्या होत्या परंतु किती तलाठी व मंडळ अधिकारी यांनी शेतात जाऊन शेतकर्यांचे पंचनामे केले याची माहीती जिल्हाधिकारी यांनी ज्या महसुली अधिकारी यांनी स्पोर्ट पंचनामे केली नाही व जे स्पॉट पंचनामे केली आहे त्यांचा अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात यावे अशी मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे. व जे तलाठी व मंडळ अधिकारी यांनी स्पॉट पंचनामे केली नाही त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी. कडा येथील मंडळ अधिकारी नवनाथ देवराव औंधकर यांचा शेतकऱ्यांवर अरेरावची भाषा वापरत आहे.

हे मंडल अधिकारी 10 वर्षापासुन कडा शहरात नौकरी करत आहेत त्यांची लवकरात लवकर बद्दली करण्यात यावी यासाठी तहसीलदार यानां अर्ज सुध्दा सादर केला आहे. यांची काटेकोर पणे जिल्हाधिकारी यांनी दखल घ्यावी प्रगतशील शेतकरी रुपचंद कर्डीले यांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.

## हम है ‘अटल’ : मनोज पवार



### ➤मनोज पवार यांनी केला भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश ➤कन्नड तालुक्यात होतोय शुभेच्छांचा वर्षाव

कन्नड : प्रतिनिधी

तालुक्यातील युवा उद्योजक तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मनोज केशवराव पुष्पाबाई पवार यांनी काल भारतीय जनता पार्टी (BJP) मध्ये शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मध्ये मुंबई येथील नरिमन पॉईंट भाजपा कार्यालयात महसूल मंत्री तथा प्रदेशअध्यक्ष नामदार चंद्रशेखरजी बावनकुळे व जलसंपदा मंत्री नामदार गिरीज महाजन, भाजपा कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, आणि प्रदेश सरचिटणी आमदार संजय केनेकर, प्रदेश सचिव किरण पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या विशेष उपस्थिती मध्ये मुंबई येथे जाहीर प्रवेश केला.

प्रवेश प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या भाषणात मनोज पवार यांचे सामाजिक योगदान त्याचबरोबर व्यापारी दृष्टिकोनाची प्रशंसा करत, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सदरील पक्षप्रवेश सोहळा शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला.

या ऐतिहासिक पक्षप्रवेश सोहळ्यामध्ये अनेक सामाजिक कार्यकर्ते तसेच मनोज भाऊ पवार मित्र मंडळ जल्लोष करताना दिसून आले.

## कदमवस्ती येथे परमपूज्य संत बाळूमामा पालखी तीनचे प्रस्थान

### महाप्रसादाचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन

वडवणी : प्रतिनिधी

परमपूज्य संत बाळूमामा पालखी क्र.03 कदमवस्ती वडवणी येथे दि.15/06/2025 रोजी आली असता भावीक देखील बाळुमामाच दर्शन घेण्यासाठी व मेढ्या पाहाण्याची उत्सुकतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. परमपूज्य संत बाळूमामा पालखी ही भक्तांसाठी फक्त एक धार्मिक परंपरा असून आध्यात्मिक मार्गदर्शन करणारी यात्रा आहे. भक्ती, कीर्तन, नामस्मरण यांद्वारे भाविकांच्या मनात श्रद्धा व अध्यात्म जागवते,

हा पालखी सोहळा, लोकांना एकत्र आणते. परमपूज्य संत, बाळूमामांचा संदेश सर्वसमावेशक आहे, त्यामुळे विविध समाजघटक या पालखीत सहभागी होतात. यामधून समाजात समभाव, सहकार्य आणि परस्पर आदर निर्माण होतो पालखीच्या दर्शनाने भक्तांचे जीवन चैतन्यमय होऊन दैन्य दूर होते.

● पान २ वर...





सद्गुरू संत बाळु मामाच्या पालखीत मला पंगत देण्याचा मान मिळाला खरं तर माझं भाग्य आहे सहजासहजी हा मान कुणाला मिळत नाही. तसेच पालखीचे क्र. 03 चे संचालक व टिमचे यांचे खुप खुप आभारी आहे.

**रामधन नागरगोजे**
पंगतीचे मानकरी

# वृषभ, सिंह, तूळ, कुंभ राशीसह इतर राशींसाठी आजचा दिवस कसा असेल, जाणून घ्या

## मेष रास

मेष राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस गोंधळात टाकणारा असेल . तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल . काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते . जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर उद्या या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल . तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल . राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो . जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात .

## वृषभ रास

वृषभ राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल . तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु उद्या भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून उद्यापासून भागीदारीचे काम सुरू करू नका . तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल . सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे . तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल . कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास उद्या यशस्वी होईल .

## मिथुन रास

मिथुन राशीसाठी उद्याचा दिवस खूप शुभ राहणार आहे . तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते . तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता . मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल . तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील . तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील . आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल .

## कर्क रास

कर्क राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे . तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील . कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील . उद्या तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता . कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो .

## सिंह रास

सिंह राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस अचानक लाभदायक असेल . पण उद्या गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे . व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो . तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल .

## कन्या रास

कन्या राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल . मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल . परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते . तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल . उद्या एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल .

## तूळ रास

उद्या, सोमवार तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल . तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी उद्याचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल . कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो . तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते . खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल .

## वृश्चिक रास

वृश्चिक राशीचे राशीचे उद्या तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल . व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल . एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका,अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते . पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो . आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते . विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल .

## धनु रास

उद्याचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल . तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल . अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत ःच्या कामात लक्ष द्यावे . जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता . जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर उद्या ती सुधारेल . कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल . एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो .

## मकर रास

उद्याचा दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो . तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल . कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते . उद्या तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु उद्या कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका . उद्या तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो . तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते . मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील .

## कुंभ रास

कन्या राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस चांगला राहणार आहे . व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल . जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते . जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते . विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते . ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल .

## मीन रास

मीन राशीसाठी उद्याचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे . तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील . तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते . तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही उद्या यशाकडे वाटचाल कराल . उद्या व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल . नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील . वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर उद्या ती सुधारेल .

# सोशल मीडियाचे स्तोम: समाज कुणीकडे जात आहे?



विशेष

● डॉ . भारत कऱ्हाड

गेल्या दहा–पंधरा वर्षांमध्ये सोशल मीडियाने आपल्या जीवनात इतकी खोलवर मुळे रोवली आहेत की आता ती केवळ संवादाचं माध्यम राहिलेली नाही, तर एक समांतर समाजव्यवस्था बनली आहे . फेसबुक, व्हॉट्सॲप, इंस्टाग्राम, एक्स ( पूर्वीचं ट्विटर ), यूट्यूब, आणि आता विविध शॉर्ट व्हिडिओ ॲप्स – या सगळ्यांनी आपलं जीवन व्यापून टाकलं आहे . एकेकाळी मनोरंजन, माहिती किंवा संवादासाठी वापरण्यात येणाऱ्या या माध्यमांनी आता आपली सामाजिक, राजकीय आणि वैचारिक जाणीवच बदलून टाकली आहे . आणि याच स्फोटात प्रश्न निर्माण होतो – समाज कुठे जात आहे ?

सोशल मीडियाच्या सुरुवातीच्या काळात, हक्काच्या अभिव्यक्तीचा एक नवा मार्ग खुला झाला . सामान्य व्यक्तीचा आवाज जगभर पोहोचू शकतो, हे एक मोठं सामर्थ्य होतं . मात्र जसजसा वेळ गेला, तसतसं हे माध्यम अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचं नव्हे तर गोंधळ, भ्रम आणि विद्वेष पसरवण्याचं हत्यार बनलं . अफवा, खोटी माहिती ( fake news ), धार्मिक तेढ, जातीपातीतून द्वेष निर्माण करणारी पोस्ट्स, आणि ट्रोलिंग – हे नवे "सामान्य" झाले .

यातच निर्माण झाला एक "वर्चस्वाचा झगडा" – कोण किती व्ह्यूज मिळवतो, किती लाईक्स घेतो, किती फॉलोअर्स त्याच्यामागे आहेत, हेच सामाजिक प्रतिष्ठेचं मापदंड बनू लागलं . विचार, मूल्य, सुसंवाद, किंवा नैतिकता यांना मागे टाकून 'व्हायरल' होणं हेच उद्दिष्ट झालं . परिणामी, अनेकदा खोटं बोलणं, अतिशयोक्ती करणं, कीवा दुसऱ्यांची बदनामी करणं – हे फायदेशीर ठरू लागलं .

विद्यार्थ्यांपासून ते वृद्धांपर्यंत, सर्व वयोगट सोशल मीडियात गुंतले आहेत . पण यातून किती जण प्रश्न विचारतात, तपासून माहिती घेतात, मूल्यमापन करतात – हे पाहिलं तर फारच कमी टक्का दिसतो . बहुसंख्य लोक "फॉरवर्ड" संस्कृतीत अडकले आहेत – समजून न घेता पाठवायचं, फेक असो की फॅक्ट .

विशेषत : राजकारण आणि धर्माच्या नावाने सोशल मीडियावर जे



सुरू आहे ते अधिक चिंताजनक आहे . एका ठराविक विचारसरणीच्या विरोधात आवाज उठवला की ट्रोल करणं, धमक्या देणं, अश्लील भाषेचा वापर करणं – हे रोजचं झालं आहे . आणि याचं वाईट म्हणजे, या ट्रोलिंगला राजकीय पक्ष, काही प्रसारमाध्यमं, आणि समाजातील विशिष्ट गट खुलेआम पाठींबा देतात . त्यामुळे विचारस्वातंत्र्याचा गळा घोटला जातो . मानसिक आरोग्यावरही याचा गंभीर परिणाम होत आहे . किशोरवयीन मुलांमध्ये आत्महत्येचं प्रमाण सोशल मीडियाच्या कारणांनी वाढलं आहे . 'बॉडी इमेज' कॉम्प्लेक्स, FOMO ( Fear of Missing Out ), आत्मभानाची अस्वस्थता – हे आजचे टीन एजर्स अनुभवत आहेत . सामाजिक तुलना इतकी वाढली आहे की "तुमचं आयुष्य इन्स्टाग्राम स्टोरी इतकंच सुंदर असायला हवं" हा दबाव निर्माण होतो आहे .या सगळ्या प्रवाहात सत्य कुठे आहे याचा शोध कोणी घेत नाही . कारण फक्त खरं बोलणं पुरेसं नाही – ते आकर्षक असलं पाहिजे, गोंधळात टिकून राहिलं पाहिजे . त्यामुळेच, शास्त्र, संशोधन, माहिती, किंवा विद्वत्तेच्या गोष्टींकडे कोणी फिरकतही नाही .त्याचवेळी, दुसरी बाजू सुद्धा लक्षात घ्यायला हवी . सोशल मीडिया ही केवळ नकारात्मक गोष्ट नाही . अनेक चळवळी, जनजागृती, आपत्ती काळात मदतीचे आवाहन, लहान कलाकारांना व्यासपीठ, आणि उपेक्षितांचा आवाज – हे सुद्धा सोशल मीडियाच्या सामर्थ्यातून घडतं . पण हे प्रमाण, सध्याच्या गोंगाटात हरवलेलं आहे . आपण ज्या वेगाने डिजिटल स्फोटाकडे जात आहोत, त्याच वेगाने माणूस म्हणून आपलं असं काहीतरी हरवत चाललो आहोत – संवादाची सुसंस्कृती, विचारांची खोली, सामाजिक बांधिलकी, आणि विवेक .प्रश्न इतकाच आहे की, सोशल मीडिया आपल्याला दिशा दाखवतोय की दिशाभूल करतोय ? आपण माहितीच्या युगात जगतोय की अफवांच्या अंधारात ? आणि समाज म्हणून आपण पुढे चाललो आहोत की मागे सरकत आहोत ?

उत्तर काहीही असो, एक गोष्ट निश्चित – आपण जर सजग नागरिक म्हणून, विचार करणाऱ्या व्यक्ती म्हणून, विवेकानं वापर करणाऱ्या युजर्स म्हणून पुढे आलो नाही, तर सोशल मीडियाच समाजाचं भविष्य ठरवेल – आणि ते कसं असेल, याची कल्पनाही नको .

( लेखक डॉ . भारत कऱ्हाड हे माजी वित्त व लेखा अधिकारी ( जळगांव विद्यापीठ ) आहेत . )



# सुघोष भैय्या मुंडे यांचा वाढदिवस सर्वपक्षीयांसमवेत सामाजिक उपक्रमाने जल्लोषात साजरा

गेवराई : प्रतिनिधी

भाजपाचे युवा नेते माजी आमदार नारायणराव जी मुंडे साहेब यांचे चिरंजीव सामाजिक कार्यकर्ते इंजिनीयर श्री सुघोष नारायणराव मुंडे यांचा जन्मदिवस महात्मा फुले विद्यालय व कॉलेज भगवान नगर गेवराई येथे विद्यार्थ्यांना शालेय गणवेश शैक्षणिक साहित्य व फळे वाटून तसेच सामाजिक बांधिलकी म्हणून वाढदिवस थाटामाटात साजरा न करता अनाथ मुलांच्या सोबत बालग्राम सहारा अनाथालय येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून व मिष्टान्न भोजन देऊन तालुक्यातील वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांच्या व सर्वपक्षीयांच्या उपस्थितीमध्ये साजरा करण्यात आला यावेळी भाजपाचे युवा नेते नोटरी ऍड राहुलकुमार राका ,माजी सरपंच अशोक खरात,वंचित चे तालुकाध्यक्ष पप्पूजी गायकवाड, शिवसेना तालुका उपप्रमुख धर्मराज जी आहेर यांनी आपले मनोगत व्यक्त केले .

यावेळी बोलताना युवा नेते श्री रोहित भैय्या पंडित यांनी सुघोष जी मुंढे यांचा वाढदिवस आपण सर्व विविध पक्षांचे मित्रमंडळी मिळून साजरा करीत आहोत व सहारा अनाथालयात आदर्श उपक्रम करून साजरा होत आहे ही एक नवीन पर्वाची सुरुवात आहे असे विचार व्यक्त केले .

यावेळी वाढदिवसाच्या सत्काराला उत्तर देताना श्री .सुघोष भैय्या मुंढे यांनी सर्वांचे आभार मानून माझा वाढदिवस हा अनाथ मुलांसोबत साजरा होत आहे ही खूप आनंदाची गोष्ट आहे तसेच माझ्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात स्वर्गीय लहू तात्या पंडित यांचे नातू हे सहभागी झाले आहेत याचा मला विशेष आनंद वाटतो लहु तात्यांनी आम्हाला वेळोवेळी सहकार्य केले आहे यावेळी त्यांनी सर्वांचे आभार मानले .

सहारा अनाथालयाच्या वतीने त्यांना शुभेच्छापत्र व औक्षण करून लहान लहान मुला – मुलींनी व स्टाफ ने शुभेच्छा दिल्या . यावेळी भाजपाचे युवा नेते नोटरी ऍड श्री . ॲड .राहुलजी राका, भाजपाचे युवा नेते श्री ईश्वरजी पवार शिवसेनेचे तालुका उपप्रमुख श्री धर्मराज जी आहेर, माजी सरपंच श्री अशोक खरात, राष्ट्रवादीचे युवा नेते श्री विलास जिजा निकम, वंचित चे तालुकाध्यक्ष अजयकुमार ( पप्पू सेठ ) गायकवाड, मार्गदर्शक प्राध्यापक राजेंद्र बरकसे सर, श्री अभिजीत कवडे, युवा नेते श्री सचिन भैय्या पंडित, श्री बाबासाहेब घोडके, कृष्णा बारगजे, विलासराव मस्के, शेख खाजा मामू, मंजूरभाई बारुदवाले, पत्रकार श्री लक्ष्मण उमाप, बाबासाहेब आंधळे, दिलीप मुंडे, नानाभाऊ मुंडे, श्रीकृष्ण बारगजे,परमेश्वर महाराज वाघमोडे, अंकुश ढाकणे, अनिकेत मुंडे, सचिन बारगजे, अमोल ढाकणे, जावळे राहुल, क्षीरसागर रमेश, श्री भारत नागरे, सलमान मोजम, सय्यद मोजम, निलेश आघाव, नितीन ढाकणे, अनिल ढाकणे, भास्कर गीते, संग्राम नागरे, किरण मिसाळ , नारायण खेडकर, श्रीमंत तेरे, वैष्णव काकाजी, माऊली गीते , श्री संतोष गर्जे सर्वे सर्वा सहारा अनाथालय आश्रम व इतर मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये वाढदिवस साजरा करण्यात आला .




http ://epaper .beedvastav .com
https ://www .beedvastav .com


# मुलानी वाडगाव येथे सामाजिक अंकेक्षण २०२४-२५ च्या अनुषंगाने विशेष ग्रामसभा

पैठण : सर्जेराव खडसन

तालुक्यातील मुलानी वाडगाव ग्रुप ग्राम पंचायत कार्यालयाच्या वतीने दि .( १७ ) गुरुवार रोजी ११ वाजता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सामाजिक अंकेक्षण सण २०२४ – २०२५ च्या अनुषंगाने विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते . या विशेष ग्रामसभेस गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड व राजेश कांबळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली .

या प्रसंगी गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड व सहाय्यक गट विकास अधिकारी कांबळे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नव्यानेच प्रवेश घेतलेल्या सर्व नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करत अभिनंदन केले . या दरम्यान त्यांनी गावातील अंगणवाडी भेट दिली .व ग्राम पंचायत कार्यालयाच्या वतीने त्यांच्या हस्ते गावातील शाळेजवळ असलेल्या मोकळ्या जागी वृक्षारोपण करण्यात आले .यावेळी ग्राम पंचायत अधिकारी बी .बी . गव्हाणे, सरपंच वंदना अनिल लांडगे,उपसरपंच सतीश शेळके



यांच्यासह सदस्य राजू मिसाळ,अश्विनी शिरवत, ज्योती मिसाळ,पद्माबाई,शेळके, शांताबाई तीत्तर, बानोबी सय्यद, साधना जाधव, मा .सरपंच गणेश पा .शेळके शालेय समितीचे सखाराम पा .मिसाळ, मा .उपसरपंच धनाजी पा . मिसाळ,ग्रा . पं .सदस्य बाळासाहेब मिसाळ, सावळीराम तीत्तर, अफसर सय्यद, बद्रीनाथपाटील मुख्याध्यापक जगदाळे, जेजुरकर यांच्यासह कर्मचारी वाल्मीक दुबिले, विजय शिंदे, योगेश शिरवत, सुरज शिरवत किरण मिसाळ इत्यादीसह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती .

# आनंददायी आणि दर्जेदार शिक्षण जिल्हा परिषद शाळेतच मिळते - अमोल जगताप

आष्टी : सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये मराठी माध्यमाच्या शाळा बाजूला जाऊन इंग्रजी माध्यमांनी त्यावरती अतिक्रमण केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे . परंतु मराठी शाळा टिकल्या तरच गरीब ,कष्टकरी ,सर्वसामान्याची मुले शिक्षण घेतील नाहीतर इंग्रजी माध्यमाच्या शाळेला पहिलीच्या वर्गापासूनच लाखो रुपयांच्या फीस घेतल्या जातात परंतु शिक्षण मात्र तसं मिळत नाही . याउलट जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये मोफत , दर्जेदार आणि आनंददायी शिक्षण मिळते . यासाठी पालकांनी आपल्या मुलाचा जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये प्रवेश घेऊन जिल्हा परिषदेच्या शाळा वाचवल्या पाहिजेत नाहीतर भयान वास्तव समोरील येईल की , सर्वसामान्यांची मुलं शिक्षणापासून कायमचे वंचित राहतील हे सर्व टाळण्यासाठी मराठी माध्यमाच्या शाळेतच पालकांनी प्रवेश घेतले पाहिजेत व आपल्या मुलांना तणावमुक्त शिक्षण दिले पाहिजे यातूनच अनेक उच्चपदस्थ अधिकारी घडल्याचा इतिहास आहे . असे प्रतिपादन प्रसिद्ध निवेदक तथा पत्रकार अमोल जगताप यांनी केले . जि . प . कें . प्रा . शा . शिराळ ता . आष्टी येथे दि . १६ जून रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांना मोफत गणवेश , पाठ्यपुस्तके तसेच शूज इत्यादी शालेय साहित्य देऊन इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या नवागत मुलांचे जोरदार स्वागत करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अमोल जगताप हे बोलत होते . याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक संतोष दाणी यांनी मुलांना अनेक वेगवेगळ्या मार्गाने शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला . तसेच शाळेत राबविण्यात येणारे विविध उपक्रम व शासकीय योजना याबद्दल सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांनी शाळेत शंभर टक्के उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्यावे व शाळेची शिस्त पाळून आपल्या शाळेचे





नाव उज्वल करावे असे आव्हाहन केले .या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक परमेश्वर जगताप , मंगल झगडे , राजेंद्र ढवण , सतीश शिंदे यांच्यासह पालक आजिनाथ जगताप , शरद आजबे , किरण खंडागळे आदी उपस्थित होते .यावेळी इयत्ता पहिलीच्या मुलांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले . इयत्ता पहिलीच्या वर्गात दाखल झालेल्या नवीन विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करून मोफत पाठ्यपुस्तके , गणवेश व इतर साहित्याचे वाटप करण्यात आले . तसेच मुलांना प्रधानमंत्री पोषण आहार योजनेअंतर्गत स्वादिष्ट असा गोड शिरा खाऊ घालून मुलांचे स्वागत करण्यात आले . यामुळे दिवसभर मुलांच्या चेहऱ्यावरती आनंद ओसांडून वाहत होता .


पान १, ३ , ४ वरून


## मुंबई येथील 23 वी इंटरनॅशनल स्पोर्ट्स जीत कुणे- डो कराटे स्पर्धेत बीडच्या विद्यार्थ्यांना 10 पदके

● पान १ वरून . . . नोंदवला होता . या स्पर्धेसाठी बीडचे प्रतिनिधित्व म्हणून मुख्य कराटे प्रशिक्षक तथा कराटे असोसिएशन महाराष्ट्र अध्यक्ष ऍडव्होकेट . नितीन पवार सर यांनी काम पाहिले व त्यांचे सहकारी म्हणून महिला प्रतिनिधित्व आरती सतकर यांनी सहकार्य केले . या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील 10 विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला होता .

त्यात सहभागी विद्यार्थी म्हणून यश डोंगरे ( गोल्ड मेडल ), अथर्व गोसावी( सिल्वर मेडल ), शिंदे अर्जुन( सिल्वर मेडल ), भक्ती इंगळे( सिल्वर मेडल ), श्रेयस वाघमारे( सिल्वर मेडल ) तसेच अनुष्का बडे( ब्रॉंझ मेडल ), शांभवी डावकर( ब्रॉंझ मेडल ), शांभवी डावकर( ब्रॉंझ मेडल ), राजरत्न कापसे( ब्रॉंझ मेडल ), रोहन मस्के( ब्रॉंझ मेडल ), संभाजी वाघमारे( ब्रॉंझ मेडल ), यांनी सहभाग घेऊन हे पारितोषिक मिळवले आहे . या सर्व खेळाडूंना मेडल व सन्मानचिन्हे देऊन आयोजकांनी सन्मानित करण्यात आले . दुर्दम्य, आत्मसन्मान, आत्मविश्वास, मनातला उत्साह, द्रढ चिकाटी आणि प्रचंड इच्छाशक्ती सकारात्मक वृत्ती असली की माणूस असाध्य ते साध्य करू शकतो याची साक्ष आज बीडच्या दहा कराटे खेळाडूंनी मुंबई येथील स्पर्धेमध्ये मिळवलेले विजयाची साक्ष देते . या सर्व खेळाडूंना वेळोवेळी मार्गदर्शन करणारे बीड जिल्ह्याचे मुख्य कराटे प्रशिक्षक तथा बीड जिल्हा सचिव जीत कुणे डो असोसिएशनचे सचिव एडवोकेट नितीन पवार सर यांच्या सुद्धा सर्वत्र कौतुक होत आहे की त्यांनी या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आज या पदकापर्यंत पोहोचवले व त्यांना मोलाचे सहकार्य महिला प्रतिनिधी तथा जीत कुणे डो असोसिएशनच्या जिल्हा उपाध्यक्ष एडवोकेट आरती सतकर यांनी केले .

## कदमवस्ती येथे परमपूज्य संत बाळूमामा पालखी तीनचे प्रस्थान

● पान १ वरून . . . तर रोज सकाळ संध्याकाळ पंगतीचे देखील नियोजन करण्यात आलेल आहे काल सकाळचे अन्नदाते प्रभु नागरगोजे व रात्रीचे अन्नदाते आसाराम परभळे यांची होती . आणि आज सकाळ पंगतीचे दावेदार बाळु लोकरे व रात्रीची पंगत अशोक लांडे, नामदेव लांडे, दादासाहेब कदम, दत्ता कदम यांची आज पंगत होईल पंगतीचे दावेदार यांनी प्रसादाचा आनंद घेण्यासाठी उपस्थित राहण्याचे आव्हान केले आहे . सह .पो . नि . वर्षा व्हगाडे, उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, मा . नगरसेवक आत्माराम जमाले, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, पोलीस अमालदार खरात साहेब मराठी पत्रकार परिषदेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत .

**सह .पो .नि वर्षा व्हगाडे यांची आरतीसाठी उपस्थिती राहणार**

सद्गुरू संत बाळूमामा च्या पालखी क्रमांक तीन च्या आरतीसाठी वडवणी पोलीस स्टेशनच्या सह पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा व्हगाडे या संत बाळुमामाची आरती साठी उपस्थित राहणार आहेत व भेट देऊन संत बाळूमामांना पुष्पहार अर्पण करून आरतीसाठी उपस्थित राहणार असल्याची माहिती पत्रकार संभाजी लांडे यांनी दिली .


सांज दैनिक बीड वास्तव
सायं . दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक,मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी . बीड –४३११२२ ( महाराष्ट्र ) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ ( महाराष्ट्र ) येथून प्रसिद्ध केले . संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट , निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ ( या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही ) ( वाद–विवाद बीड न्याय कक्षेत ) मो . 9022952922

# वाढता लठ्ठपणा आरोग्यासाठी धोक्याची घंटा



मुंबई (प्रतिनिधी) : स्थूलपणा हे अनेक आजारांचे प्रमुख कारण आहे. हृदयाचे आजार, मधुमेह आणि काही प्रकारचे कॅन्सर स्थूलपणामुळे होतात.

● अनेक गंभीर गुंतागुंतीच्या समस्या शरीरात निर्माण होतात. त्यामुळे स्थूलपणावर उपाय करणे हे वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी नव्हे तर प्राणघातक आजारांना आळा घालण्यासाठी महत्त्वाचे आहे.

● मुलांमध्ये स्थूलपणा वाढत आहे, ही अजूनच चिंताजनक बाब आहे. भारतामध्ये ५ ते १९ वर्षे वयाची जवळपास १२ .५ मिलियन मुले २०२२ मध्ये स्थूलपणाने ग्रस्तस्त होती. ही आकडेवारी जगात सर्वात जास्त आहे आणि १९९० पासून यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

● स्थूलपणा भारतातील शहरी आणि निम-शहरी भागांमध्ये वाढत असलेली एक साथ आहे. प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ, साखर मिसळलेली कोल्ड्रिंक्स यांचा वाढता खप, मोबाइल टीव्ही स्क्रीनवर खूप जास्त वेळ घालवणे आणि शारीरिक हालचाली खूपच कमी करणे ही या समस्येची प्रमुख कारणे आहेत.

● जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, स्थूलपणा हे अनेक आजारांचे प्रमुख कारण आहे. हृदयाचे आजार, टाईप २ मधुमेह आणि काही कॅन्सर स्थूलपणामुळे होतात.

# तहसिलदार वैशाली पाटील यांच्या लेखी आश्वासनाने अशोक साळवे यांचे उपोषण मागे

आष्टी : प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अनेक गोरगरीब निराधार, दिव्यांग लाभार्थी हे गेले सहा महिन्यापासुन संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेचे रमाई घरकूल, पंतप्रधान घरकुल योजनेचे मानधन व निधीपासुन वंचीत आहेत. त्या लोकांवर उपसमारीची वेळ आलेले आहे. पंचायत समितीमध्ये घरकुल धारकांना सहा महिन्यापासुन हप्ता दिला गेला नाही.

आष्टी पंचायत समितीमधील घरकुल विभागातील कर्मचारी व अधिकारी हाताकडे पाहतात. त्यांचा बंदोबस्त करण्यात यावा. गरीबांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्यांवर कारवाई व्हावी तसेच तहसिलदार यांनी गटविकास अधिकारी यांना घरकुलांचे पैसे देण्याचा आदेश द्यावा, या व इतर मागण्यासाठी मंगळवार दि. १७ जुन रोजी तहसिल कार्यालयासमोर रिपाइं आठवले गट तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी उपोषण सुरु केले होते.

तहसिलदार यांनी उपोषण कर्त्याच्या मागण्या संबंधित वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे पाठविल्या. लवकरच या मागण्या पुर्ण होतील. तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिलेल्या लेखी पत्रात म्हटले आहे की, विशेष सहाय योजनेच्या लाभार्थ्यांना शासनाचे डीबीटी धोरणानुसार अनुदान शासन स्तरावरुन वितरीत करण्यात येते .षशासन निर्णय २० ऑगस्ट २०१९ नुसार विशेष सहाय योजनेच्या लाभ घेण्यासाठी आधार कार्ड सक्तीचे केले आहे. आधार कार्डद्वारे शासन स्तरावरुन थेट लाभ हस्तांतरण करण्यात येत आहे. ज्या लाभार्थ्यांची माहिती आधारसह शासनाचे डीबीटी



पोर्टलवर पडताळणी पूर्ण झाली अशा लाभार्थ्यांना शासन स्तरावरुन डीबीटीद्वारे अनुदान वितरीत करण्यात येत आहे. उर्वरीत लाभार्थ्यांची माहिती तलाठीस्तरावरुन संकलित करुन शासनाचे डीबीटी पोर्टलवर भरण्यावी प्रक्रिया सुरु आहे. ज्या लाभार्थ्यांना अनुदान मिळत नाही अशा लाभार्थ्यांना त्वरीत तलाठी कार्यालयात आपले कागदपत्रे जमा करणेबाबत या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्दी पत्रकाद्वारे लाभार्थ्यांना कळविण्यात आलेले आहे. ज्या लाभार्थीचे आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास प्राप्त झाले अशा लाभार्थ्यांना शासन स्तरावरुन अनुदान वितरीत होत आहे. उर्वरित लाभार्थ्यांची माहिती ऑनलाईन झालेनंतर त्याही लाभार्थ्यांना अनुदान वितरीत होणार आहे म्हणून उपोषण न करता उपोषणापासून परावृत्त व्हावे अशी विनंती केली आहे. यावेळी अव्वल कारकुन (शासन) भगीरथ धारक, पंचायत समितीचे अजय निंबाळकर, चव्हाण, रविंद्र ढोबळे, सचिन बाप्पा गोंदकर यांच्या मध्यस्थितीने हे उपोषण सुटले. तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी उपोषण मागे घेतले आहे. या उपोषणात तालुकाध्यक्ष अशोक साळवे, पॅंथर संभु साळवे, शांताराम जोगदंड, बाबासाहेब गायकवाड, पंढरीनाथ साबळे, रतन जाधव, युवराज साळवे, साखरबाई त्रिबक पाचपुते, कमल गोरख ससे, शिवबाई बन्शी काकडे, राधाबाई पोपट शिंदे, इंदुबाई बापु कदम, गयाबाई विनायक खंडागळे, लिलाबाई बाळु पवार, मालनबाई अंबादास धोत्रे, आयशा शिराज सय्यद, शिंदु अशोक निंबाळकर, सत्यभामा सुदाम जामदाडे, सुनिता बाळु जाधव, मंगल कचरु शिरोळे, गिता शिवाजी पवळ यांनी सहभाग घेतला होता. या उपोषणात १०० वर्षाची आजीबाई देखील सहभागी झाल्या होत्या.



# एकलव्य संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी परशुराम सोनवणे यांची निवड

कन्नड : प्रतिनिधी



एकलव्य संघटना संस्थापक अध्यक्ष मा.श्री. पवनराजे सोनवणे यांच्या अध्येक्षतेखाली व मा.श्री बाळासाहेब बरडे यांच्या प्रमुख उपस्थितीत एकलव्य संघटना छ. संभाजीनगर जिल्ह्याची जिल्हास्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात अले. बैठक संपन्न झाल्यावर परशुराम सोनवणे यांची नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. आदिवासी समाजातील दुर्बल घटकातील लोकांचे हक्क कर्तव्य जाणकार असलेले व्यक्तिमत्व म्हणजे परशुराम सोनवणे ! त्याचबरोबर समाजाला भेडसावणाऱ्या समस्या चा परशुराम सोनवणे यांनी जवळून विषय अभ्यासलेला आहे.

याबाबत छत्रपती संभाजी नगर हा विभाग परशुराम सोनवणे यांच्यासाठी नवीन नाही याकरिता जिल्हाध्यक्ष या पदांनुरूप त्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी (जिल्हाध्यक्ष) सुनील ठाकरे, (जिल्हाध्यक्ष) बजरंग सोनवणे, (युवा जिल्हाध्यक्ष) हितेश ठाकरे, (युवा जिल्हा कार्याध्यक्ष) संतोष सोनवणे, (जिल्हा उपाध्यक्ष) सुभाष सोनवणे, (तालुकाध्यक्ष कन्नड) सचिन पवार, (खुलताबाद तालुकाध्यक्ष) वसंत पवार, (वैजापूर तालुकाध्यक्ष )राजू ठाकरे, (कन्नड शहराध्यक्ष) अरुण मालिकर, (युवा तालुकाध्यक्ष वैजापूर) उमेश सोनवणे( युवा तालुकाध्यक्ष )कन्नड ज्ञानेश्वर सोनवणे (विध्यार्थी आघाडी तालुकाध्यक्ष) कन्नड सुरेश गायकवाड, ( ग्रामीण तालुकाध्यक्ष खुलताबाद) श्रीमती. सुनीता ताई मोरे (महिला आघाडी तालुकाध्यक्ष कन्नड) मारुती भाऊ पवार जयसिंग गायकवाड सुनील सोनवणे, व जिल्हातील सर्व कार्यकर्ते व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पात्रुड येथील देवस्थान च्या जमिनीवरील अतिक्रमण काढून सदरील जमीन शासनाच्या ताब्यात द्या !

## - एकता पत्रकार संघाचे उपविभागीय कार्यालया समोर आमरण उपोषण

माजलगाव : तालुक्यातील पात्रुड येथील स.नं./गट नं.१०६ क्षेत्र ४ हे ७१ आर. जमीन श्रीराम मंदिर बीड या देवस्थानाच्या जमीनीवर प्लॉटींग करुन बेकायदेशीर विक्री करणाऱ्यावर व घेणाऱ्यावर गुन्हे दाखल करुन अतिक्रमण धारकांना नोटीस देवुन अतिक्रमण काढुन सदर जमीन शासनाच्या ताब्यात देण्यात यावी या व इतर मागण्या संदर्भात एकता पत्रकार संघाच्या वतीने येथील उपविभागीय अधिकारी कार्यालया समोर उपोषण सुरू केले आहे.

या बाबत थोडक्यात माहिती अशी की, तालुक्यातील पात्रुड येतील गट नंबर १०६ ही जमीन श्रीराम मंदिर बीड या नावाने असून या जमिनीवर बेकायदेशीरपणे खरेदी-विक्रीचे रॅकेट चालू असून बेकायदेशीर खरेदी विक्री करणाऱ्या वर व अतिक्रमण धारकावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे यासाठी माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले होते. या निवेदनातील मागण्याची दखल घेत मा. जिल्हाधिकारी बीड यांनी दि. २२/४/२०२५ रोजी च्या बेमुदत धरणे आंदोलनास शासन नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येईल असे तक्रारदारांना व निवेदनकर्त्यांना अवगत करत उपोषणापासून परावृत्त केले होते. परंतु यावर कुठल्याही प्रकारची कारवाई केली न गेल्यामुळे दि. २६/५/२०२५ रोजी या प्रकरणाची दखल न घेतल्यामुळे उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना या संदर्भात निवेदन देत माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने याप्रकरणी दि.१६ जून रोजी बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता परंतु पात्रुड येथील सर्वे नं/ गट नं. १०६ मधील ४ हे.७१ आर. या



जमिनीवर श्रीरंग मारुती बारवकर या व्यक्तीने एक बोरवेल पाडून त्याचा फेरफार आपल्या नावावर लावून या जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे.

ही अतिक्रमणित जागा हा व्यक्ती प्लॉटिंगच्या नावावर बेकायदेशीरपणे विक्री करत आहे. त्यामुळे अतिक्रमण धारकांना व खरेदी विक्री करणाऱ्या वर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे निवेदन देण्यात आलेले होते परंतु आज तगायत याप्रकरणी अतिक्रमण धारकांना व बेकायदेशीर विक्री करणाऱ्या व घेणाऱ्या वर कसल्याही प्रकारची कारवाई उपविभागीय अधिकारी माजलगाव यांच्याकडून केली गेली नसल्यामुळे काल दि १६ जून पासून माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने उपविभागीय कार्यालया समोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येत आहे. याप्रकरणी लवकरात लवकर कारवाई न केल्यास आंदोलन हे चालूच राहणार आहे असे तक्रारदारांच्या वतीने सांगण्यात आली आहे.

# खुल्या गटाची राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा धुळ्यात तर; किशोर गट परभणीत तर कुमार गट बीडमध्ये होणार

माजलगाव / प्रतिनिधी :



डॉ प्रा चंद्रजित जाधव


वरिष्ठ गट (खुला गट) पुरुष व महिलांची राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा धुळ्यात होणार असल्याची माहिती महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजित जाधव यांनी दिली. पुणे येथील नेहरू स्टेडियमवरील महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या कार्यालयात झालेल्या शासकीय परिषदेच्या बैठकीत यंदाच्या मौसमातील राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धांची ठिकाणे निश्चित करण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी संघटनेचे चेअरमन सचिन गोडबोले, खजिनदार गोविंद शर्मा, माजी सरचिटणीस प्रा. जनार्दन शेळके, सहसचिव जयांशु पोळ, डॉ राजेश सोनवणे, डॉ पवन पाटील व बाळ तोरसकर आदी उपस्थित होते.

या बैठकीत किशोर गट स्पर्धा परभणीत तर कुमार गट बीड किंवा अहिल्यानगरमध्ये घेण्यात येणार असल्याचे निश्चित करण्यात आले. राज्यातील पंचांचे प्रशिक्षण शिबिरही जुलै अखेर धुळ्यात होणार असल्याचे प्रा. डॉ. जाधव यांनी सांगितले. तसेच राज्य खो खो पंच परीक्षा रविवार २९ जून रोजी घेण्यात येणार आहे. संलग्न जिल्हा संघटनानी आपली नोंदणी २० जून पर्यंत सायंकाळी पाच वाजेपर्यंत maharashtrakhokhoassociation@gmail.com या मेलवर करावी.

या बैठकीत निवड समिती सदस्य, प्रशिक्षक व सहाय्यक प्रशिक्षक यांच्याही नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. त्या नियुक्त्या याप्रमाणे आहेत.

निवड समिती, प्रशिक्षक व सहाय्यक प्रशिक्षक असे - निवड समिती :
पुरुष - महिला : सुरेंद्र विश्वकर्मा (मुंबई)राम चोखट (परभणी), कृष्णा करंजळकर (रत्नागिरी), प्रियांका चव्हाण (ठाणे)
कुमार - मुली : श्रीनिवास मेतरी (रायगड), मनोज परदेशी (नंदुरबार), योगेश सोलसे (बीड), राखी जोशी (पुणे).
किशोर - किशोरी : भाऊसाहेब पवार (अहिल्यानगर), नरेंद्र रायलवार (हिंगोली),
पंढरीनाथ बडगुजर (धुळे), छाया लांडगे ( छत्रपती संभाजीनगर).
प्रशिक्षक व सहाय्यक प्रशिक्षक :
पुरुष : नरेंद्र कुंदर ( मुं.उपनगर ), अजित शिंदे (सोलापूर). महिला : नरेंद्र मेंगळ (ठाणे ), निकिता पवार (धाराशिव). कुमार : मोहन रजपूत (सोलापूर ), सुजित माळी (लातूर) मुली : अभिजीत पाटील (धाराशिव), ऐश्वर्या सावंत (रत्नागिरी). किशोर : विकास सूर्यवंशी (छ. संभाजीनगर), धीरज दंडवते (पुणे)
किशोरी : अतुल जाधव (सोलापूर), सुरज शिंदे (हिंगोली) यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| कु | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

वि शे ष



# दलित आघाडी तालुका उपाध्यक्षपदी मोरे यांची निवड

आष्टी (जालना) : प्रतिनिधी

मागील अनेक वर्षे सामाजिक चळवळीत काम केलेले आणि सध्या भाजप मध्ये सक्रिय सहभागी होऊन पक्षाचे क्रियाशील सभासद असणारे योगेश मधुकर मोरे यांची भाजपा दलित आघाडी परतूर तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे,

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचाराने प्रेरित होऊन तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेश अध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे कार्याध्यक्ष रविंद चव्हाण यांच्या आदेशानुसार माजी मंत्री तथा परतूर तालुक्याचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेश सचिव राहूलभैया लोणीकर यांच्या सूचनेवरून सदरील नियुक्ती करण्यात आली असून नियुक्ती पत्रात म्हटले आहे की भारतीय जनता पक्षाला ताकद मिळवून देण्यासाठी आणि पक्षाचे ध्येय धोरण विचारात घेऊन पक्षाचे काम तळागाळा पर्यंत व सामान्य नागरिकांना पर्यंत पोहचवून पक्ष वाढीसाठी काम करावे असे नमूद केले आहे सदरील नियुक्ती पत्रावर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे यांची स्वाक्षरी असून मोरे यांच्या निवडीचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# भाजपा युवा मोर्चाच्या तालुका उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर सोळंके यांची निवड



ज्ञानेश्वर सोळंके नियुक्तीपत्र देते वेळेस आमदार बबनराव लोणीकर

आष्टी (जालना) : प्रतिनिधी

मागील अनेक वर्षे सामाजिक चळवळीत काम केलेले आणि सध्या भाजप मध्ये सक्रिय सहभागी होऊन पक्षाचे क्रियाशील सभासद असणारे माऊली सोळंके यांची भाजपा युवा मोर्चाच्या परतूर तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे,

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचाराने प्रेरित होऊन तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेश अध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे कार्याध्यक्ष रविंद चव्हाण यांच्या आदेशानुसार माजी मंत्री तथा परतूर तालुक्याचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेश सचिव राहूलभैया लोणीकर यांच्या सूचनेवरून सदरील नियुक्ती करण्यात आली असून नियुक्ती पत्रात म्हटले आहे की भारतीय जनता पक्षाला ताकद मिळवून देण्यासाठी आणि पक्षाचे ध्येय धोरण विचारात घेऊन पक्षाचे काम तळागाळा पर्यंत व सामान्य नागरिकांना पर्यंत पोहचवून पक्ष वाढीसाठी काम करावे असे नमूद केले आहे सदरील नियुक्ती पत्रावर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे यांची स्वाक्षरी असून सोळंके यांच्या निवडीचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# लोहगाव ते ब्रम्हगव्हाण रस्त्याची केंद्रीय समितीकडून पाहणी





पैठण : सर्जेराव खडसन

पैठण तालुक्यातील ग्रुप ग्राम पंचायत मावसगव्हाण येथे लोहगाव ते ब्रम्हगव्हाण या दोन गावादरम्यानच्या रस्त्याचे काम प्रधान मंत्री ग्रामीण सडक योजने मधुन पूर्ण झाल्याने या रस्त्यांच्या कामाचा दर्जा तसेच या परिसरात असलेल्या गावांच्या नागरिकांना या रस्त्यांचा किती फायदा झाला या बाबींची सत्यता पडताळणी करण्यासाठी दि.(१४) रोजी केंद्र स्तरीय समितीने भेट दिली. यामध्ये केंद्रीय समितीच्या सीमा दिपक यांच्यासह सोशल एक्सपर्ट के.बी.डी.ए.बी.डी डॉ.अनुराग तिवारी, सोशल एक्सपर्ट के.बी.डी.ए.बी.डी शिवकुमार द्विवेदी, एक्झिक्यूटिव्ह के.बी.डी.ए.बी.डी. विजय खडेकर, कार्यकारी अभियंता आर.ए.वारकरी, उपअभियंता एस.पी. राजपूत, तसेच ग्रा.पं.अधिकारी बाळकृष्ण तान्हाबाई भाऊसाहेब गव्हाणे, सरपंच रुख्मनबाई शिंदे, उपसरपंच छाया कानुले, सदस्य, ज्ञानेश्वर तेजीनकर चंद्रकला साळवे, सरला सुराशे, सुभद्राबाई तेजीनकर, रुख्मनबाई गावंदे, विठ्ठल पवार, प्रकाश जाधव, सुलभा शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे यांच्यासह पोलीस पाटील, कर्मचारी विजय केदारे, सचिन तेजीणकर हसन शेख, महेश शिरवत आणि गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


ई पेपर वाचा
• सांज दैनिक बीड •
वास्तव
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com


# उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी दिला स्वतःच्या मुलीचा जिल्हा परिषद शाळेत प्रवेश; सर्वत्र होतेय कौतुक

माजलगाव / प्रतिनिधी :

अंबाजोगाई डायट येथील जेष्ठ अधिव्याखाता श्रीकिशन देशमुख हे माजलगाव मध्ये राहतात त्यांनी आपली मुलगी कु सानिका हिला जिल्हा परिषद शाळेतच शिकविण्याचा निर्णय घेतला व शाळेच्या पहिल्या दिवशी स्वत: तालुक्यातील सावरगाव केंद्रात असलेल्या जिल्हा परिषद प्राथमीक शाळा गुजर पंचशिल या शाळेत जाऊन मुलीचा प्रवेश निश्चित केला.

जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कमी होत असताना अशा प्रकारचा निर्णय ज्येष्ठ अधिव्याख्याता श्रीकृष्ण देशमुख व त्यांच्या पत्नी सौ किरण देशमुख (तौर) या येथील नामांकित कॉलेज मध्ये प्राध्यापक म्हणून काम पाहातात या उच्च शिक्षित दाम्पत्याने घेतलेला निर्णय ही एक कौतुकाची बाब आहे सर्व जिल्हा परिषद शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांनी जर जिल्हा परिषद शाळेमध्ये आपल्या पाल्याला प्रवेश दिला तर जिल्हा परिषद शाळेचा दर्जा नक्कीच सुधारेल अशी आशा वाटते. देशमुख यांचे हे पाऊल जिल्हा परिषद शाळा टिकविण्यासाठी असल्याचे दिसून येते. मात्र खुद्द जी प च्या गुरुजी ची मुलं कुठंतरी दूर इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेत असल्याने या लोकांनी खरंतर आत्मचिंतन करण्याची गरज आहे असं शिक्षण प्रेमी नागरिकांचे म्हणणे आहे.



# कन्या शाळेत पहील्या दिवशी पहिलीच्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या पाल्यासह पालकांचाही सत्कार

गेवराई : प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शाळा प्रवेशोत्सव या उपक्रमांतर्गत गेवराई येथील जि.प मा.कन्या शाळेत पहिल्या दिवशी नविन वर्षात पहिलिच्या वर्गात प्रवेश देण्यात येणाऱ्या नवीन पाल्यांसोबत पालकांचाही सत्कार करण्यात आला. सदरील कार्यक्रमा प्रसंगी अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री सोळुंके सर तर प्रमुख अतिथी म्हणून शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षा सारीकाताई महेंद्र जवंजाळ सदस्या गायकवाड ताई शाळेतील तज्ञ शिक्षक श्री गलधर सर, कुमार गर्कळसर, खरात सर, मिसाळ मॅडम, कोकाटे मॅडम रुमी मॅडम, देशमुख सर पंडितसर, घोडके सर विलास सोनवणे सर शबाना मॅडम आडागळेसर, बारहाते सर, गुंजाळ सर शिंदे मॅडम तसेच पालक, नवागत प्रवेशीत विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन आणि पहिल्या पाऊलखुणा ठसा घेऊन स्वागत करुन प्रवेश अर्ज भरून प्रवेश देण्यात आला. या प्रसंगी गलधर सरांनी पालकांसाठी मोलाचं मार्गदर्शन केले तर मुख्याध्यापक साहेबांनी शाळेच्या प्रगतीचा लेखाजोखा विशद केला. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये जे शिक्षक आहेत त्या पेक्षा सुमार दर्जाचे उच्चशिक्षित शिक्षक जि.प.च्या शाळेत विद्यार्जनाचं कार्य करतात. जि.प. शाळेत देखील या वर्षी पासून पहिली इयत्ता करीता सिबीएससी पॅटर्न इंग्लिश स्कूल सुरूवात झाली आहे. तरी महागड्या शाळेत प्रवेश न घेता जिल्हा



परिषदेच्या शाळेत मुलांना प्रवेश घ्यावा अशी विनंती केली. शासनाच्या सुविधांचा उपभोग गोरगरीब पालकांनी घ्यावा अशी विनंती केली शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सारिकाताई महेंद्र जवंजाळ आणि सदस्या रुपालीताई गायकवाड यांनी नवागताचे स्वागत करून शुभेच्छा दील्या. तसेच पालकांसाठी प्रवेशासाठी आव्हानात्मक विचार व्यक्त केले. शेवटी मिसाळ मॅडम यांनी आभार प्रदर्शन करून सर्वांचे आभार मानले. चहापान कार्यक्रमानंतर मुलांचे प्रवेश पत्र भरुन घेतले राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली या कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक बंधु भगिनी तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# गेवराई येथे शिवारोग्य इंटरनॅशनल स्कूलचे उद्घाटन



गेवराई : प्रतिनिधी

गेवराई येथे शिवारोग्य इंटरनॅशनल स्कूल हे इंग्रजी माध्यमाच्या नवीन शाळेचे नुकतेच उद्घाटन संपन्न झाले उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रशासकीय अधिकारी श्री.तारुकर सर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री.मधुकर तौर, पत्रकार ॲड.शेख हारुन सर सय्यद सर हे होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. सहशिक्षिका बनसोडे मिस आणि गिरी मिस यांनी स्वागत गीत सादर केले. श्री तारुकर सरांच्या हस्ते नवीन रिबीन कापून शाळेचे उद्घाटन पार पडले. त्यानंतर शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा व पालकांना पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रस्ताविक सहशिक्षक श्री.सय्यद मुक्ताबा यांनी केले.

आपल्या प्रस्ताविकात त्यांनी इंग्रजी भाषेचे महत्त्व आणि संभाषणावर प्रभुत्व प्राप्त करण्याबद्दल मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या या युगात इंग्रजी भाषेचे महत्त्व विशद करताना त्यांनी नवीन स्थापित शिवारोग्य इंटरनॅशनल स्कूलचे ध्येय व धोरण उपस्थितां च्या समोर मांडले. संस्थेचे कार्यवाह श्री ज्ञानेश्वर बाणाईत सर यांनी PPT प्रेजेंटेशन द्वारे प्रभावी पणे शाळेचे अभ्यासक्रम व विविध सुविधावर प्रकाश टाकले. याप्रसंगी पत्रकार मधुकर तौर यांनी इंग्रजी माध्यमाची नवीन शाळा सुरु केल्याबद्दल संचालक व स्टाफला शुभेच्छा दिल्या आपल्या अध्यक्षीय समारोपात श्री तारुणकर सर यांनी दर्जेदार शिक्षणाचे महत्त्व सांगितले. शाळा सुरू केल्याबद्दल त्यांनी अभिनंदन व शुभेच्छा व्यक्त केल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य राजू घुले सर यांनी केले. व आभार प्रदर्शन श्री राठोड रविंद्र सर यांनी केले. कार्यक्रमासाठी शहरातील प्रतिष्ठित नागरिक पालक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक नाईक, सर संत, पठाण सर, शेमे मिस इत्यादींनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. तसेच संचालक यांनी प्रवेशासाठी वर्ग नर्सरी, सिनियर केजी, जूनियर केजीसाठी मो 9607496001 संपर्क करावे असे सांगितले.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासातील सातत्य, ध्येय व चांगल्या सवयी आत्मसात कराव्यात - पत्रकार किशन भदर्गे

माजलगाव / प्रतिनिधी :

शहरातील नावारूपाला आलेली व प्रतीथ यश राजस्थानी माध्यमिक व प्राथमिक शाळेमध्ये आज दिनांक १६ जून २०२५ रोजी शाळेचा पहिला दिवस असल्याने इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांचे व विद्यार्थिनींचे पुष्पगुच्छ व खेळणी पुस्तके देऊन स्वागत करण्यात आले व आनंदाच्या व हरषोउल्लासाच्या वातावरणात शाळेचा पहिला दिवस सुरू झाला याप्रसंगी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष व सायं दैनिक अभिमानाचे माजलगाव तालुका प्रतिनिधी किशन भदर्गे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी अभ्यासातील सातत्य ध्येय निश्चिती व चांगल्या सवयी आत्मसात करून पुढील आयुष्यामध्ये चांगली शिक्षण घेऊन स्वत:चा सर्वांनी विकास करून



घ्यावा या कार्यक्रमाचे अध्यक्ष व माहेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री ओमप्रकाश मानधने संस्थेचे सचिव व ज्येष्ठ संपादक श्री रामानंदजी लड्डा, राजस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.तौर सर प्रार्थमिक विभागाच्या मुख्याध्यापिका तौर मॅडम तसेच पालकांचे प्रतिनिधी लांडगे आप्पा

याप्रसंगी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व त्यांना पुष्प देऊन त्यांचं सहर्ष स्वागत करण्यात आले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. तौर मॅडम यांनी केली सूत्रसंचालन मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन सरांनी केले.

# कायाकल्प अवॉर्डमध्ये सादोळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्ह्यात अव्वल; दोन लाखाचे पारितोषिक जाहीर





माजलगाव / अरविंद ओव्हाळ :

आयुक्त आरोग्य सेवा व मिशन डायरेक्टर नॅशनल हेल्थ मिशन महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२४-२५ या वर्षात महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात कायाकल्प हॉस्पिटल अवॉर्ड ही संकल्पना राबवण्यात होती. यात म जिलगाव तालुक्यातील सादोळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला या पुरस्काराचा मान मिळाला.

सार्वजनिक आरोग्य सुविधांची गुणवत्ता वाढवणे, त्यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता तसेच सर्व अद्यावत तंत्रज्ञान अवगत करून आरोग्यदायी वातावरण निर्माण करणे, प्राथमिक आरोग्य केंद्रातील स्वच्छता, बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट, इन्फ क्शन कंट्रोल व आरोग्य सेवेतील गुणवत्ता या निकशावर सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांची विविध स्तरावर तपासणी करण्यात आली. या सर्व तपासणीमध्ये सादोळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास ९३.१० टक्के गुण मिळाल्याने हे केंद्र जिल्ह्यात अव्वल ठरले. हा पुरस्कार मिळवताना या आरोग्य केंद्रास मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने व जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ यांची मोलाचे मार्गदर्शन लाभले. या आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी डॉ. रमेश घुमरे व डॉ. दत्तात्रय पारगावकर हे काम पाहत आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराचे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ रौफ शेख, डॉ. सचिन शेकडे, डॉ विकास आठवले, डॉ. बालासाहेब लोमटे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मधुकर घुबडे, या गावचे सरपंच व उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य सादोळा व समस्त गावकरी यांनी आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

## कर्मचारी यांचा सत्कार :

येथील सादोळा प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्ह्यात काया कल्प मध्ये नंबर एक मध्ये आल्याबद्दल प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर घुमरे साहेब आणि त्यांची संपूर्ण टीम या सर्वांचा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सादोळा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला त्या समयी उपस्थित सर्व शिक्षक बांधव व आरोग्य कर्मचारी प्राथमिक आरोग्य केंद्र सादोळा



# इम्तियाज जलील यांच्यावर कारवाई करा - विकास बागुल

कन्नड : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी काही वादग्रस्त विधान करून आंबेडकरवादी अनुयायांच्या भावना दुखावल्यामुळे माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी कन्नड तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तसेच काही ज्येष्ठ नागरिक करीत आहेत. संबंधित प्रकरणाची निष्पक्षपणे कारवाई न झाल्यास संपूर्ण आंबेडकर समाज तीव्र आंदोलन झेडणार असे मत विकास बागुल, राजधर आहेर, चंद्रशेखर धरमसोत, भास्कर देवरे, ईश्वर गायकवाड, नाना अहिरे, सिद्धार्थ निकम, ललित गायकवाड, शुभम साबळे, प्रवीण निकम, कमलाबाई घाडगे, अक्षय महाले, पवन गायकवाड आदी सामाजिक कार्यकर्त्यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय येथे उपस्थित होते.

चोवीस लाखाचा मुद्देमाल जप्त

महातपुरी शिवारातील गोदावरी नदी पात्रातून करीत होते वाळू उपसा

# माजलगाव ग्रामीण पोलीसांची वाळू चोरावर कार्यवाही

माजलगाव / प्रतिनिधी :

पोलिस स्टेशन माजलगाव ग्रामीण हद्दीतील महातपुरी शिवारातील गोदावरी नदी पात्रातून १) आकाश राजाभाऊ शिंदे २) रमेश बाबासाहेब चव्हाण ३) छत्रभुज तुकाराम कोलते हे ट्रॅक्टरच्या सहाय्याने अवैद्य वाळू उपसा करून वाहतूक करीत आहेत अशी खात्रीलायक माहिती मिळाल्यावरून सदर ठिकाणी काल दि १६ रोजी सकाळी ५ वा. छापा मारला असता खालील वर्णनाचे ०३ ट्रॅक्टर व ट्रॉली मिळून आले ते खालील प्रमाणे.

१) आकाश राजाभाऊ शिंदे रा. महातपुरी फार्मा कंपनीचे निळ्या रंगाचे ट्रॅक्टर हेड किंमत ६,००,०००/- रु व काळ्या रंगाची ट्रॉली त्यामध्ये ०१ ब्रास वाळू किंमत ६,०००/- रु व ट्रॉली किंमत १,००,०००/- रु असे एकूण ७,०६,०००/- रु. मुद्देमालासह मिळून आला. २) रमेश बाबासाहेब चव्हाण रा. महातपुरी हा पोलीस रेड पार्टीस पाहून त्याच्या ताब्यातील महिंद्रा अर्जुन कंपनीचे लाल रंगाचे हेड किंमत ७,००,०००/- लाल व पिवळ्या रंगाची ट्रॉली किंमत १,००,०००/- असे एकूण ८,००,०००/- रुपयाचा





मुद्देमाल व त्यामधील वाळू खाली करीत असताना मिळून आला.

३) छत्रभुज तुकाराम कोलते रा. महातपुरी याच्या ताब्यातून महिंद्रा अर्जुन कंपनीचे व लाल रंगाचे ट्रॅक्टर हेड किंमत ८,००,०००/- रुपये व लाल व पिवळ्या रंगाची ट्रॉली किंमत १,००,०००/- रु. असे एकूण ९,००,०००/- रु. चा मुद्देमाल व त्यामधील वाळू पोलीस रेड पार्टीस पाहून खाली करत असताना मिळून आला.

असे एकूण तीन ट्रॅक्टर एक ट्रॅक्टर मध्ये वाळू भरलेले व दोन ट्रॅक्टर मधील वाळू खाली करीत असताना मिळून आले असून एकुण किंमत २४,०६,०००/- रु. चा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.

संबंधित आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून मा. तहसीलदार यांना गौण खनिज अधिनियमानुसार येथील ग्रामीण पोलीस स्टेशन चे पी आय बालक कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय सोनवळे, पो हे उद्दव राऊत, पो अ गोविंद बाबरे, पो अ गणेश ठेंगल, पो अ किशोर खेत्रे यांनी सदरील कार्यवाही केली.